# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ-२०१९/प्र.क्र.१०/का- ५,
नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक-०८ नोव्हेंबर, २०१९.

वाचा:- १) राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र. रानिआ/मनपा-२०१२/प्र.क्र.५१/का.५, दि. ३१/०१/१३

२) राज्य निवडणूक आयोगाचे परिपत्रक क्र.-रानिआ-२०१३/प्र.क्र.२५/का-९, दि. १७/७/१३.

३) सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३, दिनांक ३१/१२/२०१५.

## परिपत्रक

मा. उच्च न्यायालयाच्या WP८३८९/२००५ मध्ये मा. उच्च न्यायालय मुंबई मधील निकालाच्या आधारे उपरोक्त संदर्भ क्र.१ मधील पत्र निर्गमित करण्यात आले होते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिनियमांमध्ये मागासवर्गीयांसाठी आरक्षित असलेल्या पदावरून निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने नामनिर्देशनपत्रासोबत जोडलेले जात प्रमाणपत्र हे जात पडताळणी समितीने अवैध ठरविल्यास, त्यांचे अनर्हतेचे औपचारिक आदेश काढण्याची कार्यवाही महापालिकांच्या बाबतीत संबंधित महानगरपालिका आयुक्त, जिल्हापरिषद व पंचायत समिती यांच्या बाबतीत संबंधित विभागीय आयुक्त तसेच नगरपरिषद/नगरपंचायत व ग्रामपंचायतीच्या बाबतीत संबंधित जिल्हाधिकारी यांनी विनाविलंब करावी, अशा सूचना देण्यात आल्या होत्या.

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या SLP १९२९६/२०१३ मधील निकालाच्या आधारे उपरोक्त परिपत्रक निर्गमित करण्यात आले होते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिनियमांमध्ये मागासवर्गीयांसाठी आरक्षित असलेल्या पदावरून निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने नामनिर्देशनपत्रासोबत जोडलेले

जात प्रमाणपत्र हे जात पडताळणी समितीने अवैध ठरविल्यास त्यांना अनर्ह ठरविण्याबाबत कळविण्यात आले आहे.

याच विषयाबाबत दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ रोजी मुंबई महापालिका अधिनियम १८८८, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ व महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मध्ये सुधारणा करण्यात आली आणि अनुक्रमे कलम १६ (१क), कलम १०(१क) व १६ (१) समाविष्ट करण्यात आले, ज्यामधील पोटकलम (अ) नुसार 'जात प्रमाणपत्र अवैध असल्याचे घोषित केल्याच्या आणि ते रद्दबातल ठरविल्याच्या ... दिनांकास व त्या दिनांकापासून त्या पालिका सदस्याने आपले पद रिकामे केले असल्याचे मानण्यात येईल'. आणि पोटकलम (ब) नुसार '... राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे अशा व्यक्तीस अशा आदेशाच्या दिनांकापासून सहा वर्षाच्या कालावधीकरिता पालिका सदस्य म्हणून निवडून येण्यास किंवा पालिका सदस्य म्हणून असण्यास अनर्ह ठरविल'. परंतु ग्रामपंचायत अधिनियम १९५९ आणि जिल्हापरिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ यामध्ये अशी तरतुद करण्यात आलेली नाही.

असे निदर्शनास येत आहे की, अधिनियमात २०१५ मध्ये तरतूद झालेली असतानाही त्या अनुषंगाने कार्यवाही न करता; राज्य निवडणूक आयोगाच्या उपरोक्त २०१३ च्या पत्राच्या अनुषंगाने अगर सन २०१३ च्या परिपत्रकान्वये कारवाई करण्यात येते. याकरिता सदरचे दिनांक ३१/०१/२०१३ चे पत्र आणि १७/७/२०१३ चे परिपत्रक रद्द करण्यात येत आहे.

यापुढे उपरोक्त अधिनियमातील सुधारणानुसार आणि महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागसवर्ग व विशेष मागासप्रवर्ग अधिनियम, २००० च्या कलम १० 'जातीच्या खोट्या प्रमाणपत्राच्या आधारे प्राप्त करण्यात आलेले लाभ काढून घेणे....' मधील तरतुदीनुसार; जात पडताळणी समितीने जातीचे प्रमाणपत्र अवैध ठरल्यास सदस्यत्व रद्द करण्याची कारवाई महापालिकाकरिता संबंधित महापालिका आयुक्त, जिल्हापरिषद व पंचायत समितीकरिता संबंधित विभागीय आयुक्त आणि नगरपरिषद/नगरपंचायत व ग्रामपंचायतकरिता जिल्हाधिकारी यांनी तात्काळ करावी व रिक्त पदाची माहिती राज्य निवडणूक आयोगास पाठवावी.

तसेच सदर नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेतील सदस्यास पुढील ६ वर्षाकरिता अनर्ह करण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १०(१क)(ब)अथवा महाराष्ट्र नगरपरिषदा,नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम,१९६५ च्या कलम १६(१क)(ब) मधील तरतुदीनुसार शासनास प्रस्ताव पाठवून पुढील कार्यवाही करावी.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( किरण कुरूंदकर )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत :

१. सर्व विभागीय आयुक्त
२. सर्व महानगरपालिका आयुक्त
३. सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)
४. सर्व कार्यासने